# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०१/०७/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०८) इतिवृत्त

**मंगळवार, दिनांक ०१ जुलै २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला श्री.उध्दव घुगे, उप आयुक्त(म), श्री.एम.ए.पठाण, नगर सचिव यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान (मामू)
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
५. श्री.वसंत नरवडे पाटील
६. श्री. जावेद हसन खान
७. श्री. संजय जोशी
८. सौ. अल्पा विकास जैन
९. श्रीमती जयश्री किवळेकर
१०. श्री. कचरू सोनवणे
११. श्री. रविकांत गवळी
१२. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
१३. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
१४. श्री. नारायण कुचे
१५. श्री. सिताराम सुरे

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : औरंगाबाद शहराचे माजी नगराध्यक्ष पैगंबरवासी अलफखानजी यांचे दुःखद निधन झालेले आहे. स्थायी समिती सभागृहाच्या वतीने त्यांना व कै.चंद्रकांत गोखले यांना श्रध्दांजली अपर्ण करावी. |
| श्री.अ.रशिद खान | : अलफखानजी प्रेसिडेंट होते व अनेक वर्ष मेंबर होते. ते कुशल प्रशासक होते. आपल्या पार्लमेंटमध्ये मेंबर असलेले बनातवाला साहाब यांचे सुध्दा निधन झालेले आहे. तरी अलफखानजी, बनातवाला साहाब व चंद्रकांत गोखले यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करून त्यांच्या दुःखात सहभागी आहोत असा शोकसंदेश पाठवावा. |
| मा.सभापती | : सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.<br>(यावेळी पै.श्री.अलफखानजी, श्री.बनातवाला साहाब व कै.चंद्रकांत गोखले यांचे दुःखद निधानाबद्दल सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.) |
| श्री.अ.रशीद खान | : मा.सभापती साहेब मागील वेळेस सभागृहात राष्ट्रगीत सुरू असताना कॅसेट अडकत अडकत असल्याचे दिसले आज पण तोच प्रकार होतो आहे. ध्वनी व्यवस्थेतील तांत्रिक बाबी सभेपुर्वी तपासून घ्याव्यात. |
| मा. सभापती | : विद्युत विभागाचे संबंधीत अभियंता यांनी खुलासा करावा. |
| उप अभि.(वि.) | : यंत्रणेतील दोष तपासून तो दूर करण्यात येईल. |

**<u>विषय क्र. ४९ :</u>**

दिनांक **२९/०३/२००८**(का.प.क्र.२१) **व १३/०५/२००८**(का.प.क्र.०४) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : मागच्या मिटींगमध्ये शहानुरवाडीच्या संदर्भामध्ये श्री.रशीद मामू यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी उप आयुक्तांनी पुढच्या सभेत सविस्तर माहिती देतो असे सांगितले. तरी विषयपत्रिका संपल्यानंतर त्या विषयावर चर्चा व्हावी व विषया संदर्भात माहिती घेण्यात यावी.

मा.सभापती : विषय क्र.४९, ५०, ५१, ५२, ५३ मंजुरी देण्यात येते. विषय क्र.५३ मध्ये नांवात दुरूस्ती आहे त्यासह मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

दिनांक **२९/०३/२००८ व १३/०५/२००८**रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५० :** ( दि.१८/६/२००८ च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. ४२ )

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महुनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसूची नुसार रक्कम रूपये १५,००,०००/- चे अंदाजपत्रक असून सदरील काम दलित वस्ती सुधार योजना मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. संधु कन्स्ट्रक्शन | ०७.८९% कमी दराने |
| २. | मे. आर.के. कन्स्ट्रक्शन | ०४.७७% कमी दराने |
| ३. | मे.युनिव्हर्सल इंजिनिअर्स & कॉन्ट्रॅक्टर | ३५.००% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०७.८९% कमी दराची मे. संधु कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.संधु कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०७.८९% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महुनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झ ालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. संधु कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०७.८९% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१ :**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे चिकलठाणा येथील व्यापारी संकुलातील रिक्त दुकान क्र.६ चा जाहीर लिलाव जा.क्र./मनपा/मामअ/४१७/२००८ दिनांक १८-३-२००८ अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी दिली असता व दिनांक २७-३-२००८ रोजी प्रत्यक्षात बोली ठेवली असता बोलीत खालील व्यक्तीनी भाग घेतलेला आहे ते खालील प्रमाणे आहे.

दुकान क्र.६ करीता एकूण दोन व्यक्तीनी भाग घेतला होता.

**०१.** श्री.महेश विष्णु वाजे रक्कम रू.८६०/- शेवटची बोली

**०२.** श्री.पारस मुगदीया रक्कम रू.८५०/- शेवटची बोली

यामध्ये सर्वात जास्त बोली **श्री.महेश विष्णु वाजे यांनी रक्कम रू.८६०/-** इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत दुकान भाडे प्रती माह रू.७८४/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किमंतीपेक्षा जास्त आहे.

तरी अ.क्र.१ नुसार संबंधिताची जास्तीची बोली मान्य झाल्यास संबंधिताकडुन एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व पाच टक्के सेवा शुल्क घेणे योग्य व नियमाप्रमाणे मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो दुकानधारकास भरणा करावा लागेल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे चिकलठाणा व्यापारी संकुलातील दुकान क्र. ६ साठी जाहिर लिलावात श्री.महेश विष्णु वाजे यांनी रक्कम रू.८६०/- प्रती माह अशी सर्वात जास्तीची बोली बोलल्यानुसार संबंधीतास मनपाचे अटी-शर्तीनुसार सदरील दुकान भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२ :**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे साईनगर व्यापारी संकुलातील रिक्त दुकानाचा जाहीर लिलाव जा.क्र./मनपा/मामअ/४१७/२००८, दिनांक १८-३-२००८ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन दि.२७-३-२००८ रोजी प्रत्यक्षात जाहीर लिलाव ठेवला असता बोलीत खालील व्यक्तींनी भाग घेतलेला आहे ते खालील प्रमाणे आहे.

०१ दुकान क्र.२ करीता एकूण ६ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| श्री.मदनसिंग मानसिंग दोभाळ | रू.२७१०/- शेवटची बोली |
| श्री.मिलींद भालचंद्र टाकळकर | रू.२२००/- शेवटची बोली |
| श्री.आदीनाथ बाबुराव धामणे | रू.३०४०/- शेवटची बोली |
| श्री.मोहमंद युसुफ अब्दुल अजीज | रू.१३२५/- शेवटची बोली |
| **श्री.मदनसिंग सुखदेव चव्हाण** | **रू.३०५०/- शेवटची बोली** |
| श्री.रमेश भिकचंद खटोड | रू.२९५०/- शेवटची बोली |

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.मदन सुखदेव चव्हाण यांनी प्रती माह रक्कम रू.३०५०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१३२०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०२ दुकान क्र.३ करीता एकूण ६ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| श्री.अभय संचेती | रू.४०५१/- शेवटची बोली |
| **श्री.रमेशचंद भिकचंद खटोड** | **रू.४३५१/- शेवटची बोली** |
| श्री.सुदाम गुलामराव वरकड | बोलीत उपस्थित नाही. |
| श्री.सुभाष शंकर पुजारी | रू.४३४०/- शेवटची बोली |
| श्री.भाऊसाहेब काळे | रू.३६००/- शेवटची बोली |
| श्री.सुनिल सुखदेव चव्हाण | रू.३५००/- शेवटची बोली |

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.रमेशचंद्र भिकचंद खटोड यांनी प्रती माह रक्कम रू.४३५१/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१३२०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

तरी अ.क्र.१ व २ नुसार संबंधितानी जास्तीची बोली बोलल्यानुसार त्यांची बोली मान्य झाल्यास संबंधिताकडुन एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व ५ टक्के सेवाकर घेणे योग्य व नियमाप्रमाणे मालमत्ता कर जो येईल तो अर्जदारास भरणा करावा लागेल.

सदरील दुकान भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे साईनगर व्यापारी संकुलातील दुकानांसाठी झ ाालेल्या जाहिर लिलावात दुकान क्र. २ करीता श्री.मदनसिंग सुखदेव चव्हाण यांनी रक्कम रू.३०५०/- प्रती माह

व दुकान क्र. ३ करीता श्री.रमेशचंद भिकचंद खटोड यांनी रक्कम रू.४३५१/- प्रती माह अशी सर्वात जास्तीची बोली बोलल्यानुसार संबंधीतास मनपाचे अटी-शर्तीनुसार सदरील दुकाने भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५३ :</u>**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे जय टॉवर येथील व्यापारी संकुलातील रिक्त दुकानाचा जाहीर लिलाव जा.क्र./मनपा/मामअ/४१७/२००८, दिनांक १८-३-२००८ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन दि.२७-३-२००८ रोजी प्रत्यक्षात जाहीर लिलाव ठेवला असता बोलीत खालील व्यक्तींनी भाग घेतलेला आहे ते खालील प्रमाणे आहे.

०१ दुकान क्र.२ करीता एकूण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| श्रीमती.राजश्री द्वारकादास गुडगील्ला | रू.१५८०/- शेवटची बोली |
| **श्रीमती.नसरीन सय्यद कैसर** | **रू.१६००/- शेवटची बोली** |

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्रीमती.नसरीन सय्यद कैसर यांनी प्रती माह रक्कम रू.१६००/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१५२५/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०२ दुकान क्र. ५ करीता एकूण ३ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| **श्रीमती.रत्ना ललीत सुराणा** | **रू.९१५०/- शेवटची बोली** |
| श्री.पुष्कर मधुकर लुळे | रू.९१००/- शेवटची बोली |
| श्री.अरूण दगडु माडुकर | रू.४६२५/- शेवटची बोली |

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्रीमती.रत्ना ललीत सुराणा यांनी प्रती माह रक्कम रू.९१५०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.२८७५/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०३ दुकान क्र.६ करीता एकूण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| **श्रीमती.राजश्री द्वारकादास गुडगील्ला** | **रू.१६३०/- शेवटची बोली** |
| श्रीमती.रत्ना ललीत सुराणा | रू.१६२५/- शेवटची बोली |

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्रीमती.राजश्री द्वारकादास गुडगील्ला यांनी प्रती माह रक्कम रू.१६३०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१५२५/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०४ दुकान क्र.७ करीता एकूण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| श्रीमती.रत्ना ललीत सुराणा | रू.१५३०/- शेवटची बोली |
| **श्रीमती.नसरीन सय्यद कैसर** | **रू.१५४०/- शेवटची बोली** |

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्रीमती.नसरीन सय्यद कैसर यांनी प्रती माह रक्कम रू.१५४०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१४३०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०५ दुकान क्र.९ करीता एकूण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| **श्रीमती.राजश्री द्वारकादास गुडगील्ला** | **रू.१८५०/- शेवटची बोली** |
| श्रीमती.नसरीन सय्यद कैसर | रू.१८३५/- शेवटची बोली |

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्रीमती.राजश्री द्वारकादास गुडगील्ला यांनी प्रती माह रक्कम रू.१८५०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१७१६/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०६ दुकान क्र.१३ करीता एकूण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| **श्री.पुष्कर मधुकर लुले** | **रू.१८५०/- शेवटीच बोली** |

श्री.अरूण दगडु माडुकर रू.१८४५/- शेवटची बोली

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.पुष्कर मधुकर लुले यांनी प्रती माह रक्कम रू.१८५०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१७१६/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०७ दुकान क्र.१६ करीता एकूण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री.अरूण दगडु माडुकर रू.१८५५/- शेवटची बोली**

श्री.पुष्कर मधुकर लुले रू.१८००/- शेवटची बोली

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.अरूण दगडु माडुकर यांनी प्रती माह रक्कम रू.१८५५/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१७१६/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०८ दुकान क्र.१७ करीता एकूण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री.अरूण दगडु माडुकर रू.१८७५/- शेवटची बोली**

श्री.पुष्कर मधुकर लुले रू.१८६०/- शेवटची बोली

त्यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.अरूण दगडु माडुकर यांनी प्रती माह रक्कम रू.१८७५/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.१७१६/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

तरी अ.क्र.१ ते ८ नुसार संबंधितानी जास्तीची बोली बोलल्यानुसार त्यांची बोली मान्य झाल्यास संबंधिताकडुन एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व ५ टक्के सेवाकर घेणे योग्य व नियमाप्रमाणे मालमत्ता कर जो येईल तो अर्जदारास भरणा करावा लागेल.

सदरील दुकान भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : विषय क्र.५३ मध्ये पुष्करच्या जागी माडूकर अशी दुरूस्ती करण्यात यावी.

मा.सभापती : विषय क्र.३ मधील नावात दुरूस्ती करण्यात यावी. विषय क्र.५४ चे टपरीधारक आणि महानगरपालिका ज्याप्रमाणे मॉडेल तयार करून देतील त्याप्रमाणे टपरी बनवावी व मनपाच्या अधिकाऱ्यांनी त्याचे परीक्षण करावे. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे जय टॉवर व्यापारी संकुलातील दुकानांसाठी झ ाालेल्या जाहिर लिलावात दुकान क्र. २, ५, ६, ७, ९, १३, १६ व १७ करीता अनुक्रमे श्रीमती नसरीन सैयद कैसर यांनी रक्कम रू.१६००/-, श्रीमती रत्ना ललीत सुराणा र.रू.९१५०/-, श्रीमती राजश्री द्वारकादास गुडगील्ला रक्कम रू.१६३०/-, श्रीमती नसरीन सैयद कैसर यांनी रक्कम रू.१५४०/-, श्रीमती राजश्री द्वारकादास गुडगील्ला रक्कम रू.१८५०/-, श्री.पुष्कर मधुकर लुले र.रू.१८५०/-, श्री.अरूण दगडू माडुकर र.रू. १८५५/- व श्री.अरूण दगडू माडुकर र.रू.१८७५/- प्रती माह अशी सर्वात जास्तीची बोली बोलल्यानुसार संबंधीतास मनपाचे अटी-शर्तीनुसार सदरील दुकाने भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मोहल्ला शहागंज येथील महानगरपालिकेचे मालकीचे आरोग्य केंद्रा समोरील रस्त्यामध्ये बाधीत असलेल्या सहा फ्रुट स्टॉलची दुकाने दिनांक १६-६-२००८ रोजीच्या अतिक्रमण हटावाच्या मोहिमे अंतर्गत निष्काशीत केल्यामुळे खालील फ्रुट स्टॉलधारकांना पर्यायी जागा देणे आहे.

| अ.क्र. | दुकानधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मोहमंद तारेक मोहमंद हादी |

०२ कय्युम खान हुसेन खान
०३ अ.समद अ.कादर
०४ ईस्माईल खॉ न्यामतुल्ला खॉ
०५ नसिब खान हुसेन खान
०६ श्रीमती.रजिया बेगम शेख नजीर
०७ अहेमद खॉ जान खॉ

करीता अ.क्र. २ ते ७ मधील फ्रुट स्टॉलधारकांना व अ.क्र.१ मोहमंद तारेक मोहमंद हादी यांची दुकान शहागंज येथील भाजी मंडईत असल्यामुळे व ही दुकान न हटविण्याकरीता दिवाणी दावा क्र.४७६/२००६ अन्वये दाखल केल्यामुळे व मा.न्यायालयाचा दि.३१-७-२००७ रोजीचा निर्णय असल्यामुळे मोहल्ला शहागंज येथील भाजीमंडईच्या आत मधील महानगरपालिकेच्या मच्छी मार्केट जवळील ६ फुट X ४ फुट या आकाराची खुली जागा महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार व चालु आर्थिक वर्षातील शिध्द शिघ्र गणकाच्या दरानुसार भाडेपट्टयावर देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : मनपामध्ये नव्याने आलेले मा.आयुक्त यांनी शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढले. त्याबद्दल मागील सभेत त्यांचे व प्रशासनाचे अभिनंदन केलेले आहे. परंतु कार्यवाही करीत असताना रोडवरील जे अतिक्रमण आपण काढले ते काढणे अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने आपण प्रत्येकाला जागा देत बसलो तर ही मोहीम वर्षभर चालणार आणि प्रत्येकाला जागा दिली तर शहरात जागाच उरणार नाही. त्यामुळे या विषयाला आमचा विरोध नोंदविण्यात यावा.

मा.सभापती : यामध्ये आपण अतिक्रमण रेग्युलाईज करीत नाही. परंतु त्या लोकांनी २००९ पर्यंत भाडे भरलेले होते आणि मा.उच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश होता. आपल्या लोकांनी चुकीने कार्यवाही केली. मा.न्यायालयाचा आदेश आहे की, ३० फुट रोडवर जे अतिक्रमण आहे ते काढणे आहे आणि भाजी मंडीच्या मधील भाग आहे. हा प्रशासकीय प्रस्ताव आहे. त्यामुळे या विषयाला मंजुरी दिली आहे.

श्री.रविकांत गवळी : याच अनुषंगाने पदमपुरा भागातही अतिक्रमण झालेले आहे. त्यामध्ये जाणीवपुर्वक काही अतिक्रमण काढण्यात आले नाही. त्यामुळे अतिक्रमण काढीत असताना दुजाभाव करू नये. अतिक्रमण काढतांना कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होता कामा नये. २-४ लोकांचा न्यायालयात स्टे आहे. काही टपरीधारक मार्कींगमध्ये आले नसतानाही प्रशासनाने ते अतिक्रमण काढलेले आहे ही चुकीची पध्दत आहे. शहागंजच्या लोकांना देता त्याच पध्दतीने प्रशासनाला सांगण्यात यावे की, त्या लोकांवर अन्याय झालेला आहे. त्याची दुरूस्ती करण्यात यावी.

मा.सभापती : या बाबतीत संबंधीत अधिकाऱ्यांकडून खुलासा घेण्यात येईल. महानगरपालिका एक मॉडेल बनवून देणार, दुकान त्यांच्या खर्चानेच बनवायची आहेत. असे आपण मागच्या मिटींगमध्ये ठरलेले आहे.

श्री.संजय जोशी : जेवढे रस्त्यात बाधीत अतिक्रमण आहे तेवढेच काढले पाहिजे. परंतु रस्त्याच्या आत आहे जी जागा महानगरपालिकेच्या मालकीची नाही असे काढले त्याचे काय?

मा.सभापती : त्या बाबतीत खुलासा घेऊन दुरूस्ती करण्यात येईल.

श्री.संजय जोशी : पदमपुऱ्यातील मार्कींगच्या बाहेरील तोडले आहे का, याचा खुलासा करण्यात यावा.

उप आयुक्त(सिडको) : पदमपुऱ्यातील अतिक्रमण ४ दिवसापुर्वी काढली. त्यात ८० फुट रूंदीचा रस्ता आहे त्याच्या लगत असलेली जागा ही महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीकरीता राखीव आहे. आपण जी अगोदर मार्कींग केली होती ती रस्त्याच्या अनुषंगाने केली होती आणि पुन्हा मागे सरकवण्याचा प्रयत्न केला त्या जागेचा ॲवॉर्ड झालेला आहे.

श्री.सजय जोशी : अवॉर्ड झालेले आहे असे उप आयुक्त(सिडको) म्हणतात तर अतिक्रमण काढायलाच पाहिजे. आवार्ड झाला का?

उप आयुक्त(सिडको) : विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे रक्कम जमा केली आहे. आवार्ड झालेला आहे.

श्री.संजय जोशी : शहानुरवाडी येथे जागेची मालकी, ताबा पावती सर्व आहे तरी पाडले जात नाही.

उप अभि.(न.र.) : पदमपुऱ्यातील जागा ही आरक्षणाखाली असून, त्यामध्ये प्रशाकीय इमारतीचे आरक्षण आहे. एसएलओ कडून पूर्ण कार्यवाही झालेली आहे. परंतु मालकी हक्काबाबत वाद असल्यामुळे रक्कम कोर्टात जमा केलेली आहे.

श्री.रशीद खान मामु : तेथे दोन जागा आहेत. एक जागा कॉर्पोरेशनची आणि दुसरी गव्हर्नमेंटची जागा आहे. परंतु मा.आयुक्तांनी विनंती केली आहे त्यास आम्ही साथ दिली. पण आपण रोड डेव्हलप करू लागलो. रोडच्या आत जाऊन तोडले ते कसे, जमीनीची मालकी ठरली नाही. समाजकल्याण विभागाने खरेदी केली का.

मा. सभापती : पदमपुऱ्यातील जागा यल्लो बेल्ट किती आहे आणि मनपाच्या प्रशासकीय इमारतीच्या रिझर्वेशनमध्ये किती आहे?

उप अभि.(न.र.) : काही दक्षिणेकडील भाग निवासी आहे. भागशः आरक्षण दक्षिणेस आरक्षण आहे. याचा सविस्तर एरिया काढून नकाशासह माहिती देता येईल.

श्री.सतीश कटकटे : आताच सांगितले की, तिन्ही जागा मनपाच्या आहेत. त्या लोकांना पैसे दिले, परंतु पैसे घेतले नाही. आपण ते जमा केले. ती जागा मनपाची आहे तर त्या जागेवर कोण व्यक्तीने अतिक्रमण केले आहे, याचा खुलासा करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : प्रश्न जेव्हा अतिक्रमणाचा येतो तेव्हा अतिक्रमण अशा व्यक्तीचे तोडले जाते की, त्याने विना परवानगी बांधलेले आहे आणि अनधिकृत जागेवर अतिक्रमण करतो. परंतु त्या जागेवर प्रशासकीय इमारतीचे किंवा आपण एलो बेल्ट असेल तर अशा वेळी अतिक्रमण काढणे गरजेचे आहे. त्या ठिकाणी व्यक्तीशः विचार केला जाऊ नये. आपण आरक्षण टाकले. सरकारी जमीन परवानगी घेतली नाही तर काढणार नाही का.

श्री.रविकांत गवळी : याचा व्यवस्थीत खुलासा करण्यात यावा. स.सदस्य श्री.पाथ्रीकर साहेबांनी सांगितले की, एका खाजगी जागेवर रिझर्वेशन आहे की काढणे गरजेचे आहे. रिझर्वेशन असताना त्या व्यक्तीने संरक्षीत भिंत बांधली ती सुध्दा काढणे गरजेचे आहे. परंतु आपला विषय वेगळा आहे. पदमपुऱ्यातील अतिक्रमण काढीत असताना तेथील काही लोकांवर अन्याय झालेला आहे. त्या लोकांकडे न्यायालयाचा त्यांच्या बाजूने निकाल असतांना कोणाचे फोन आले माहित नाही, काढण्यात आले.

श्री.संजय जोशी : रस्त्यावरील अतिक्रमण निघणे गरजेचे आहे. परंतु श्री.वझे साहेबांनी सांगितले आहे की, जागा आपली कुठली आहे याचे अजून मार्कींग झालेले नाही. तर आपली संपूर्ण जागा मार्कींग करून वायर फेन्सींग करण्यात यावे. अर्धवट का केले, पुर्ण करा. आपली जागा शोधा. आजच मार्कींग करा, आजच फेन्सींग करा. उर्वरीत सर्व तोडा.

मा.सभापती : शहरातील सर्व डीपी रोडची मार्कींग करण्यात यावी व मालकांना नोटीसेस देण्यात याव्या. रोडच्या आतील इलेक्ट्रीक पोल, टेलिफोनचे पोल हे सुध्दा हटविण्यात येणार का, यासंबंधी खुलासा करण्यात यावा.

श्रीमती जयश्री किवळेकर: आपल्या शहरात अतिक्रमण हटाव मोहीम मा.आयुक्तांनी सुरू केली त्याबद्दल आनंद झाला. आमचा अतिक्रमण काढण्याला विरोध नाही, हे शहराच्या दृष्टीने योग्य आहे. परंतु हे करीत असताना प्रशासनाने पाहायला पाहिजे की, आपली पार्कींगची जागा कोणती आहे आणि त्या जागेवर कोणाकोणाचे अतिक्रमण आहे. डी.पी.रोडवर कोणाचेही अतिक्रमण असो त्यात व्यक्तीशः विचार केला जाऊ नये. आम्ही प्रशासनाला जे अतिक्रमण काढायला सांगतो त्या ठिकाणचे अतिक्रमण काढले जात नाही. सुनियोजीत करावे.

सौ.मोमीन सफीया : शहरातील डी.पी.रस्त्यांची मार्कींग करावी. विद्युत डी.पी., विद्युत व टेलिफोन पोल्स हटवण्यात यावे.

श्री.रशीद खान मामु : अतिक्रमण काढायला आम्ही सहमत आहोत. परंतु जमीनीवर कोणाची मालकी आहे का, न्यायालयाचा जैसे थे आदेश आहे का, न्यायालयाची डिक्री आहे का ते पाहावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : कोणीही जर झेरॉक्स आणून दिली तर झेरॉक्स प्रतीवर विश्वास न करता आपण जोपर्यंत लीगल सेक्शनकडूनओपीनीयन घेवून यावर निर्णय घ्यावा. अगोदर शहानिशा करून घ्यावी आणि योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.रशीद खान मामु : स.नगरसेवक हे एका नगरसेवकावर अविश्वास दाखवीत आहेत.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : कोणी काही कागदपत्रे दिली तर त्याची शहानिशा झाल्यावरच निर्णय घ्यावा. कागदपत्रे आयुक्तांकडे सादर करावी.

श्री.वसंत नरवडे : आपण कागद आणून देतो. आपल्यापूर्वी कागदपत्रे अधिकाऱ्यांकडे असतात. कागद उपलब्ध करून दिल्यावरही काढत नाही. अधिकाऱ्यांचा ढिलाईपणा आहे.

श्री.रविकांत गवळी : श्री.पाथ्रीकर साहेबांचे म्हणणे आहे की, त्या कागदपत्रांची अगोदर शहानिशा करून घ्यावी. विधी सल्लागार यांचे अभिप्रायासाठी पाठवावे.

श्री.रशीदखान मामु : आम्ही अगोदर सर्व कागदपत्रे शहानिशा करूनच सादर केलेले आहे. विधी सल्लागार यांचेकडे न देता ज्येष्ठ वकीलांकडून माहिती घ्यावी. विधी विभागाने २ वेळा सदोष माहिती दिली. उप आयुक्त(प्र) यांचेकडे द्यावे, ते पाहतील.

श्री.कचरू मोरे : पदमपुरा भागातील अतिक्रमणाबाबत ज्येष्ठ सदस्य श्री.रशीद मामू यांनी आपल्याला माहिती दिलेली आहे व कागदपत्रे सादर केली. विधी सल्लागारांचा अभिप्रायानंतर आपण योग्य तो निर्णय घ्यावा आणि पुढच्या विषयाला सुरूवात करावी. श्री.शेटे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे पदमपुऱ्याचा डीपी रोड हा ८० फुटाचा आहे. तो दोन्ही बाजुनी आहे की एकाच बाजुने आहे याचा खुलासा करावा. हे अतिक्रमण काढीत असताना तिथल्या दुकानदारांवर व वर्कशॉप वाल्यावरती अन्याय झालेला आहे. परंतु त्या ठिकाणी एका ठिकाणचे अतिक्रमण काढायचे राहिलेले आहे. पत्र्याचे शेड असलेले अतिक्रमण काढलेले नाही. ८० फुट डीपी रोड दोन्ही बाजुला आहे का.

उप अभि.(न.र.) : ८० फुटाचा रस्ता आहे.

श्री.कचरू मोरे : दोन्ही बाजूला ४०-४० फुट. महानगरपालिकेच्या ज्येष्ठ सदस्यांच्या सांगण्यावरून होत असेल तर चुकीचे आहे. अतिक्रमण काढताना कोणा एकाचेच नुकसान होऊ नये. न्याय देतांना दोन्ही बाजूंचा विचार करावा.

श्री.रशीद खान मामु : बंगल्याची कुंपण भिंत ती पुढे असली तरी खरे धरून तेथून मोजमाप करतात.

मा.सभापती : पदमपुऱ्याच्या बाबतीत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

श्रीमती जयश्री किवळेकर: अतिमक्रमणाबद्दल चर्चा असल्यामुळे मी माझ्या भागातील अतिक्रमणाबाबत बोलते. वारंवार प्रशासनाच्या अतिक्रमण निदर्शनास आणून देवून देखील प्रशासनाने व्हीजीट करून मार्कींग करून सुध्दा ते अतिक्रमण काढल्या जात नाही. यात कुणाच्या दबावात आहे. माझ्या वॉर्डात नाला आहे त्या नाल्यावर एका शैक्षणिक संस्थेने संरक्षीत भिंत बांधलेली आहे. गेल्या दोन वर्षापासून मी त्या नाल्याची खोली कमी असल्यामुळे नाल्याची उंची वाढवून नागरीकांच्या घरात पाणी जात होते म्हणून स्लॅब टाकण्याचे काम करीत आहे. आपल्या नाल्यावर संस्थेने भिंत बांधली आहे. उप आयुक्त(सिडको) यांनी प्रत्यक्ष पाहिले. एमआयटी संस्थेला पत्र दिले की, २४ तासात जर अतिक्रमण काढले नाही तर ते पाडण्यात येईल. परंतु २० तारखेपासून आज १० दिवस झालेत, तीन दिवसापासून प्रशासनाची यंत्रणा त्या ठिकाणी सतत येते परंतु ते अतिक्रमण पाडल्या जात नाही. पोलीस यंत्रणा येते. संस्थेचे कुणीतरी येतात. प्रशासनाला सांगतात. प्रशासनाचे शब्द आहेत की, नाल्यावर भिंत बांधू देणार नाही. त्यामुळे स्लॅबचे काम थांबलेले आहे. यासंबंधी खुलासा करण्यात यावा.

मा. सभापती : उप आयुक्त (सिडको) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त(सिडको) : स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत खुलासा असा की, मी वॉर्ड अधिकारी व वॉर्ड इंजिनियर सोबत साईटवर गेलो होतो. स्लॅब टाकायला हरकत नाही पण परत आपली भिंत बांधून द्यावी असे संस्थेचे म्हणणे होते. तसे ते संयुक्तीक आहे. परंतु ती तरतुद आपल्या अंदाजपत्रकात नाही असे वॉर्ड इंजिनियरचे म्हणणे होते. आजच तडजोडीने मार्ग काढला आणि ती भिंत काढलेली आहे व ती भिंत ठेकेदाराच्या खर्चातून आपण संस्थेला बांधून देणार आहोत.

श्रीमती जयश्री किवळेकर : संस्थेला मनपाने भिंत बांधुन देवू नये. त्यांनी त्यांच्या प्रांगणात भिंत बांधावी. आपल्या जागेवरती भिंत बांधू देऊ नये.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : संरक्षण भिंत हा संस्थेचा प्रॉब्लेम आहे. त्यांना अडचण होत असेल तर त्यांची त्यांनी बांधून घ्यावी. परंतु आपल्या स्लॅबवर भिंत बांधू देऊ नये. अतिक्रमण असेल तर काढून टाकावी.

श्री.नारायण कुचे : शेटे साहेबांनी सांगितले की, ठेकेदार संस्थेला भिंत बांधून देणार. परंतु ते पैसे ठेकेदार देणार की महानगरपालिका देणार? यात अशी तरतुद आहे का की, अतिक्रमण असलेली भिंत पाडल्यानंतर ती परत बांधून द्यावी याचा प्रथम खुलासा करावा.

उप आयुक्त(सिडको) : रेल्वेची ७०० मीटरची भिंत आपण अतिक्रमण काढताना पाडणार आहोत आणि ती परत बांधून देण्याच्या अटीवरच पाडणार आहोत.

श्री.नारायण कुचे : आपण ती भिंत बांधून देणार नाहीत असे त्या संसथेला कळवावे.

मा. सभापती : सदर संस्थेची भिंत महानगरपालिकेकडून बांधून दिली जाणार नाही.

श्री.रविकांत गवळी : पदमपुऱ्याच्या बाबतीत काय निर्णय घेतला याचा खुलासा करण्यात यावा.

मा. सभापती : श्री.शेटे साहेब यांनी पदमपुऱ्याचे बाबतीत सविस्तर खुलासा करावा.

उप आयुक्त(सिडको) : पदमपुऱ्यातील जे अतिक्रमण काढले मनपाच्या प्रशासकीय इमारतीसाठी आरक्षीत जागा व समाजकल्याणची जागा याचे नियोजन व क्षेत्र इत्यादी बद्दलची सविस्तर माहिती श्री.वझे साहेब देऊ शकतील.

मा. सभापती : नगर रचनाचे उप अभियंता श्री. वझे साहेब यांनी खुलासा करावा.

उप अभि.(न.र.) : पुढील बैठकीत यासंबंधीची सविस्तर माहिती सादर करण्यात येईल.

मा.सभापती : नगर रचनाचे उप अभियंता श्री.वझे साहेब त्या भिंतीची परवानगी दिलेली आहे का, याची माहिती द्यावी.

श्री.रविकांत गवळी : मोहीम चालू आहे की बंद आहे. पुढच्या मिटींग पर्यंत कोण थांबणार आहे. पुढच्या मिटींगपर्यंत पदमपऱ्यात काही करणार नाही का? खाजगी जागावर आरक्षण, कुंपण भिंतीस महानगरपालिकेने परवानगी दिली का.

मा.सभापती : दिवेकर गॅरेज समोर आले आहे त्याचे काय करणार?

उप आयुक्त(सिडको) : आज उपलब्ध नाही. पुढील सभेपर्यंत देण्यात येईल. जगजीवनराम हौसिंग सोसायटीची जागा आहे आणि त्याचा कोर्टात वाद चालू आहे. रस्त्याचे अतिक्रमण काढलेले आहे.

श्री. सतीश कटकटे : ती जागा कोणाची आहे व त्याला बांधकाम परवानगी आहे का, कागदपत्रे आहेत का, याचा खुलासा करावा.

मा. सभापती : नगर रचनाचे उप अभियंता श्री. वझे साहेब यांनी खुलासा करावा.

उप अभि.(न.र.) : कोकणवाडी, पदमपुरा हा २४ मी. रूंदीचा रस्ता आहे. त्याचे मार्कींग आम्ही दिलेले आहे आणि त्या मार्कींगनुसार अतिक्रमण काढलेले आहे. पदमपुऱ्यात जो आरक्षणाचा भाग आहे व किती क्षेत्र रिझर्वेशनमध्ये आहे, किती निवासी याची माहिती देण्यात येईल. कुंपण भिंत परवानगी दिली का ते तपासून घेतो.

श्री.सतीश कटकटे : परवानगी दिली आहे.

उप आयुक्त(सिडको) : प्रशासकीय काळातील परवानगी आहे.

श्री.रविकांत गवळी : मी माझ्या वॉर्डातील एक समस्या मा.आयुक्तांकडे घेऊन गेलो होतो. त्यांनी त्यांनी असा खुलासा केला की, अतिक्रणाचे चार टप्पे केलेले आहेत. अगोदर शहरातील रस्त्यावरचे अतिक्रमण काढणार आहोत नंतर खुल्या जागेवरील. पदमपुऱ्यातील रस्त्यावरची अतिक्रमण मोहीम श्री.शेटे साहेबांनी राबवली. तर सर्व रस्त्यावरचे अतिक्रमण काढले का, याचा खुलासा करावा.

उप आयुक्त(सिडको) : ८० फुट रस्त्यावरील पंचवटी हॉटेल पर्यंतचे सर्व अतिक्रमण काढले.

श्री.रविकांत गवळी : संरक्षण भिंतीचा विषय होता तर संरक्षण भिंत रस्त्याच्या बाजुला येत नाही का.

उप आयुक्त(सिडको) : रस्त्यात बाधीत असणारीच अतिक्रमणे काढली आहेत.

मा.सभापती : सर्व्हे नं.१२ सिटी सव्हेर क्र.२०१५५ केसरसिंगपुरा, पदमपुरा येथे महानगरपालिकेचे ४ एकरवर रिझर्वेशन आहे. त्या रिझर्वेशनप्रमाणे अतिक्रमण विभागाने काढलेले आहे. त्या जागेवर यानंतर कुणीही अतिक्रमण करू नये याची महापालिकेने दक्षता घ्यावी आणि जे दहा लोकांच्या एलो बेल्ट मध्ये, ज्यांचे चुकीने तोडले असेल तर त्यांनी दुकाने केल्यास महापालिकेने हरकत घेवू नये. एलो बेल्टमध्ये जी महापालिकेने कार्यवाही केली आहे अशी स.सदस्यांची भावना आहे. दिवेकर गॅरेजवर मुद्दामहून कार्यवाही केलेली नाही. मार्कीगपेक्षा जास्त असलेले अतिक्रमण काढलेले आहे. याबाबत महानगरपालिकेचे उप आयुक्त श्री.घुगे साहेब चौकशी करतील. त्यांना श्री. वझे व श्री.सिकंदर अली हे त्यांना मदत करतील. चौकशी अहवाल तीन दिवसात सादर करावा.

श्री.वसंत नरवडे पा. : खरी परिस्थिती काय आहे? १-२ दिवसांत माहिती द्यावी.

श्री.रशीद खान मामु : शहरात कुठेही रास्त मार्कीग देण्यात यावी. ८० फुट रोड कोठून धरायचे. बाउन्ड्रीपासून धरतात.

श्री. रविकांत गवळी : खुलासा केला, मार्कीग केली. दहा व्यक्तींचे अतिक्रमण आपण काढतो. परंतु खुलासा करताना सांगितले की, रस्त्याच्या बाजुचे अतिक्रमण काढतो तर संरक्षण भिंत रस्त्यालगत नव्हती का याचा खुलासा करावा.

श्री.अ.रशीद खान मामु : क्रांतीचौकला मार्कीग केली का, लोकांना दुकाने खाली करायला सांगितले ती मार्कीग कशाच्या आधारे केली याचा खुलासा करण्यात यावा.

मा. सभापती : श्री. शेटे साहेब यानंतर अतिक्रमण मोहीम राबविताना रोडच्या सेंटरची मार्कीग करून टीपी सेक्शनचे सक्षम अधिकारी एम.एम. खान सोडून त्या विभागाचे उप अभियंता श्री.वझे साहेब आहेत त्यांना व श्री.पी.जी.पवार यांना सोबत घ्यावे. जोपर्यंत उप अभियंता मार्कीग प्रमाणित करत नाहीत तोपर्यंत कार्यवाही करू नये.

श्री.सतीश कटकटे : क्रांती चौकची मार्कीग कोण करत आहे?

श्री.कचरू मोरे : आपण एकीकडचे अतिक्रमण काढले. परंतु माझ्या मते डिव्हायडर सेंटर धरत असाल तर ४० फुट उत्तर दिशेचे मार्कीग करून अतिक्रमण काढायला पाहिजे. कारण गरीब, छोट्या व्यावसायिकांवर अन्याय करू नये.

श्री.संजय जोशी : सिल्लेखाना रस्ता रूंदीकरण केले परंतु त्याच्या पुढच्या पैठण गेटपर्यंत रस्ता रूंदीकरण कधी करणार ते आदेशीत करा.

मा.सभापती : जे नागरीक महानगरपालिकेच्या परवानगीने बसले असतील आणि भाडे दिले असेल त्यांनाच देणार आहोत.

श्री.कचरू मोरे : पीरबाजार ते दर्गारोड हा वर्दळीचा रस्ता आणि अतिक्रमण वाढते आहे ते लक्षात घ्यावे.

श्री.नारायण कुचे : एकूण ६ दुकाने होती, ७ दिले. मा.न्यायालयाची स्थगिती होती. सर्वांना देणार का?

मा.सभापती : त्यांना कोर्टाचा स्टे होता व प्रशासकीय प्रस्ताव असल्यामुळे त्यांना रेग्युलाईज करण्यात आले. हा प्रसताव मा.आयुक्तांनी ठेवलेला आहे. प्रशासकीय प्रस्ताव आल्यावर करण्यात येईल.

श्री.रशीद खान मामु : या विषयाला मंजुरी देण्यात यावी.

मा.सभापती : श्री.शेटे साहेब, उप आयुक्त(सिडको) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त(सिडको) : दवाखान्याच्या आवारामध्ये एकुण ६ दुकाने होती आणि श्री.मो.तारेक जे आहेत त्यांचे कोर्ट मॅटर होते त्यांचे एकच दुकान समोर होते ते काढून टाकण्याकरीता त्यांना यामध्ये समाविष्ट करून घेतले आहे. ६ दुकानाची जागा ७ मध्ये देतो.

मा.सभापती : विषय क्र.५४, विषय क्र.५५ मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला शहागंज येथील महानगरपालिकेचे मालकीचे आरोग्य केंद्रा समोरील रस्त्यामध्ये बाधीत असलेल्या सहा फ्रुट स्टॉलची दुकाने अतिक्रमण हटावाच्या मोहिमे अंतर्गत निष्काशीत केल्यामुळे खालील दर्शविलेल्या अ.क्र.२ ते ७ मधील फ्रुट स्टॉलधारकांना व अ.क्र.१ मोहमंद तारेक मोहमंद हादी यांची दुकान न हटविण्याकरीता मा.न्यायालयाचा दि.३१-७-२००७ रोजीचा निर्णय असल्यामुळे मोहल्ला शहागंज येथील भाजीमंडईच्या आत मधील महानगरपालिकेच्या मच्छी मार्केट जवळील ६ फुट X ४ फुट या आकाराची खुली जागा महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार व चालु आर्थिक वर्षातील शिध्द शिघ्र गणकाच्या दरानुसार भाडेपट्टयावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | दुकानधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मोहमंद तारेक मोहमंद हादी |
| ०२ | कय्युम खान हुसेन खान |
| ०३ | अ.समद अ.कादर |
| ०४ | ईस्माईल खॉ न्यामतुल्ला खॉ |
| ०५ | नसिब खान हुसेन खान |
| ०६ | श्रीमती.रजिया बेगम शेख नजीर |
| ०७ | अहेमद खॉ जान खॉ |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको क्षेत्रातील जाहीरात फलकास सन २००८-०९ या वर्षासाठी परवानी देणे बाबत स्थानिक वर्तमानपत्रात जा.क्र./मनपा/मामअ/४३४/२००८, दिनांक २६-३-२००८ रोजी प्रसिध्दी दिली असता प्रत्यक्षात दिनांक १-४-२००८ रोजी निविदा उघडल्या असता त्यामधील कार्यवाहीत शॉप ॲक्टचे लायसन्स मे.गरु गोदावरी इन्टरप्रायझेस यांनी जोडले नव्हते. तसेच मे.ड्रिम्स क्रिएशन, मे.सागर ॲडस् व मे.अपलिंग सर्व्हिसेस् या तिन्ही एजन्सीनी (जुन्या) गेल्या वर्षीच्या म्हणजे सन २००७-०८ निविदेच्या अनामत रक्कमेच्या पावत्या जोडल्या संचिकेत जोडल्या होत्या. ज्यांनी सन २००८-०९ साठी स्वतंत्र रक्कम भरून घेणे आवश्यक होते. ह्या चारही एजन्सीनी मिळुन ९० पैकी ५१ साईटस् आल्या आहेत व १८ जागांसाठी निविदा आलेली नाही. एकूण ६९ जागा तांत्रिक अडचणीत आहे. शिवाय साईट क्र.२३, २४ जागा खाजगी जागेत आल्यामुळे त्या देय होत नाही. केवळ २१ जागा निविदेनुसार देय होते. म्हणुन पहिल्यांदा काढण्यात आलेली निविदा रद्द करून पून्हा दुसऱ्यांदा ग्रुप नुसार जा.क्र./मनपा/मामअ/४७८/२००८, दिनांक ८-४-२००८ अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी दिली असता व प्रत्यक्षात दिनांक २२-४-२००८ रोजी निविदांचा सिलंबद पेटी उघडली असता खालील प्रमाणे एजन्सीधारकाने भाग घेतला. महानगरपालिकेने आधारभूत किमंत रक्कम रू.१८,४८,७५०/- ठरवुन दिली होती. त्यापेक्षा जास्त आधारभुत निविदेत नमूद केले आहे ते खालील प्रमाणे.

**०१.** मे.सागर एजन्सी, ग्रुप क्र.१ रक्कम रू.१,९४,५५५/-

**०२.** मे.संकेत ॲडस्, ग्रुप क्र.२ रक्कम रू.१,७५,५५०/-

**०३.** मे.उपेंद्र पब्लिसिटी, ग्रुप क्र.३ रक्कम रू.१,८०,९९९/-

०४. मे.अजय ॲडस्, ग्रुप क्र.४ रक्कम रू.१,६४,३७६/-
०५. मे.अनिल ॲडस्, ग्रुप क्र.५ रक्कम रू.१,८९,४४४/-
०६. मे.गणेश ॲडस्, ग्रपु क्र.६ रक्कम रू.२,२१,६९९/-
०७. मे.हरेश ॲडस्, ग्रुप क्र.७ रक्कम रू.१,७०,२००/-
०८. मे.अपलिंग सर्व्हिसेस्, ग्रुप क्र.८ रक्कम रू.१,७०,६००/-
०९. मे.ड्रिम्स क्रिएशन, ग्रुप क्र.९ रक्कम रू.१,८५,८८८/-
१०. मे.ईशानी सर्व्हिसेस्, ग्रुप क्र.१० रक्कम रू.१,९५,८००/-
११. मे.अभिषेक ॲडस्, ग्रुप क्र.११ रक्कम रू.१,९९,७७४/-

महानगरपालिकेने विविध मार्गावरील विद्दुत खांबावर किऑक्स लावणेसाठी प्रती किऑक्स रक्कम रू.६६६/- व ॲडपोलसाठी प्रती ॲडपोल रक्कम रू.१०००/- अशी आधारभुत किंमत ठेवण्यात आलेली होती.

त्यानुसार प्राप्त निविदा उघडल्या असता किऑक्ससाठी मे.ड्रिम्स क्रिएशन यांनी प्रती किऑक्ससाठी रक्कम रू.८८८/- निविदेत नमूद केले व मे.अपलिंक सर्व्हिसेस् यांनी प्रती ॲडपोलसाठी रक्कम रू.१२५९/- निविदेत नमूद केले जे की दोन्हीही एजन्सीधारकाने महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

सिडको क्षेत्रासाठी जाहीरात फलकाची आधारभुत रक्कम रू.१८,४८,७५०/- अशी होती त्यानुसार एजन्सीधारकांनी जास्तीचे दर निविदे नमूद करून त्यापासुन महानगरपालिकेस वार्षीक उत्पन्न रू.२०,४८,८८५/- प्राप्त होणार असून ॲडपोलसाठी रू.२,७६,९८०/- व किऑक्ससाठी रू.३,०६,३६०/- असे एकूण रक्कम रू.२६,३२,२२५/- प्राप्त होणार आहे.

तरी वरील निविदा मंजुर झाल्यास एजन्सीधारकांकडुन एक वर्षाचे जाहीरात फलकाचे शुल्क भरणा करून घेवुन त्यांनतर महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार करारनामा करून घेवुन त्यांना कार्यादेश देण्यात येईल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा पुढील आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको क्षेत्रातील जाहीरात फलकास सन २००८-०९ या वर्षासाठी परवानगी देण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदा दरानुसार अ.क्र.१ ते ११ मध्ये दर्शविण्यात आलेल्या एजन्सीनी दिलेल्या दराप्रमाणे एजन्सीधारकांकडून एक वर्षाचे जाहीरात फलकाचे शुल्क भरणा करून घेऊन मनपाच्या प्रचलित अटी-शर्तीनुसार जाहीरात फलकास परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट बांधणे करीता शासकीय अनुदान प्राप्त होणार असून, त्या अंतर्गत कांचनवाडी येथे ७५ द.ल.ली. क्षमतेचा एक किंवा १५ द.ल.ली. क्षमतेचे पाच किंवा २५ द.ल.ली. क्षमतेचे तीन सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट टप्प्या-टप्प्याने बांधण्याचे प्रस्तावीत आहे.

उक्त नमूद केल्याप्रमाणे सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट बांधणे करीता प्रत्यक्ष जागेवर सर्वेक्षण करणे, डिझाईन व नकाशेसह प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करणे, केलेल्या डिझाईन प्रमाणे कामावर देखरेख करणे इत्यादी बाबींसाठी संकल्पनार्थींची (PMC ची) नेमणूक करणे आवश्यक आहे. या कामासाठी मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार संकल्पनार्थींची (PMC) ची नेमणूक करणेसाठी राज्यस्तरीय व प्रादेशिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दीस देवुन अनुभवी कन्सल्टंटकडून दर ऑफर मागविण्यात आले असता एकुण ३ कन्सल्टंट एजन्सींनी खालील प्रमाणे दर ऑफर दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय | ४% + १२.५०% Service Tax |
| २. | एस.बी.एस. असोसिएट्स | ३% Total cost of project |
| ३. | फोर्ट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हीस | ४.५% Total cost of project |

वरील प्रमाणे फोर्ट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हीस हे अनुभवी आणि सक्षम असल्यामुळे मा.आयुक्त यांचेकडे त्यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले आणि दर कमी करण्यास सुचविले असता सदर एजन्सीचे प्रतिनिधी श्री.केतन मदनानी यांनी ३% दर अधिक सर्व्हीस टॅक्स या दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. या दराने शहरात इतर ठिकाणीही गरजेनुसार सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट बांधण्यासाठी प्रस्तावीत केल्यानुसार सर्वेक्षण करणे, डिझाईन व नकाशांसह प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करणे, केलेल्या डिझाईन प्रमाणे कामावर देखरेख करणेची कामे संबंधीत एजन्सीकडून करून घेण्याचे प्रस्तावीत आहे.

वाटाघाटी अन्वये निश्चित झालेले दर म्हणजेच प्रकल्पाच्या एकुण किंमतीच्या ३% + सर्व्हीस टॅक्स हे दर मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्यास शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : विषय क्र.५६ कोणी सादर केला. औरंगाबाद शहरामध्ये सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट बांधण्याकरीता शासनाकडून अनुदान येणार आहे. ते टप्प्याटप्प्याने बांधण्याचे प्रस्तावित आहे. याची सुरूवात करणार आहोत का याचा खुलासा करावा. |
| श्री.संजय जोशी | : आपण ३.५० कोटी रूपये खर्च करून एक सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट बांधलेला आहे. जर एक प्लँट असल्यावर शहराला दुसऱ्या प्लँटची गरज आहे का? याचा खुलासा करण्यात यावा. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी जो विषय काढला आहे तो शहराच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. करोडो रूपये खर्च करून सिव्हरेज प्लँट बांधला आहे त्याची परिस्थिती काय आहे, याचा खुलासा करण्यात यावा. |
| श्री.संजय जोशी | : PMC ला २% - ३% देऊन जर तो प्लँट चालु होत असेल तर चालू करण्यात यावा. |
| श्री.रविकांत गवळी | : स.सदस्यांनी सागितले की, सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँटवर काही वर्षापुर्वी कोटी रूपये गुंतवले आहेत पण ते कागदोपत्रीच आहे. वस्तुस्थिती काय आहे, प्लँट चालु करताना काही विभागाची एनओसी घेणे गरजेचे असते का? याला पोलुशन कन्ट्रोल बोर्डाची मान्यता आहे का? |
| श्री.रविकांत गवळी | : आपण सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट झाल्टयाला बांधला. गेल्या वर्षी या विषयावर चर्चा झााली परंतु त्याचा कुठेही उल्लेख झालेला नाही. स.सदस्यांच्या मताप्रमाणे जर तो चालू होत असेल तर यासाठी टेक्नीकल अधिकारी नेमावे व चौकशी करायला पाहिजे. कांचनवाडी हा भाग दरवेळेस निवडतो. झाल्टा येथील प्लँटमध्ये चुक कोणाची आहे, त्यांना जबाबदार धरण्यात यावे. |
| मा.सभापती | : विषय क्र.५६ स्थगित ठेवण्यात येतो. पुर्वीचा सिव्हरेज ट्रिटमेंट प्लँट चालु होतो का व यात दोषी कोण आहेत याची चौकशी मुख्य लेखा परीक्षक व कार्य.अभियंता(ड्रेविइवउ) श्री.पानझडे यांनी करावी व आठ दिवसात अहवाल सादर करावा. विषय क्र.५७, विषय क्र.५८ ला मंजूरी देण्यात येते. |
| सौ.मोमीन सफीया | : विषय क्र.५८ वॉर्ड क्र.७६ मधील ३५.०० लाखाचे काम आहे. यात गुत्तेदारांना किती पैसे देण्यात आले व एकाच वॉर्डात कॉंक्रेटींग व पेव्हर ब्लॉक कसे दिले याचा खुलासा करण्यात यावा. |
| मा. सभापती | : विषय क्र.५८ मंजूर करण्यात येतो. विषय क्र.५९ ऐनवेळी आल्यामुळे रद्द करण्यात येत आहे. स्थायी समिती मध्ये नव्याने नियुक्त झालेल्या स.सदस्या सौ.अल्पा विकास जैन यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करून त्यांचा सत्कार करण्यात येत आहे. ऐनवेळचा विषय क्र.६० मंजूर करण्यात येतो. |

**<u>ठराव :</u>**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. ५७ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर येथील श्रीमती रजनीबाई मधुरदास वैष्णव यांच्या मालकीच्या विहिरीतुन कैलासनगर स्मशानभुमीस पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यास स्थायी समिती सभा दि.२८.८.१९९८ ठराव क्र.१६५/७० अन्वये १ एप्रिल १९९६ पासुन पुढे २५ वर्षाच्या मुदतीत भाडेतत्वावर रू.१५००/- प्रती वर्ष या दराने घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे करारनामा करून घेण्यात आलेला आहे.

श्रीमती रजनीबाई मधुरदास वैष्णव यांनी सौ.लिलाबाई जगन्नाथ वैष्णव यांच्या नांवे दिनांक १३.१२.२००४ रोजी बक्षीस पत्र करून दिले आहे. त्या आधारे सौ.लिलाबाई जगन्नाथ वैष्णव यांनी मागणी करून भाडेतत्वावर घेतलेल्या विहिरीचे पाण्याप्रित्यर्थ महानगरपालिकेकडून देण्यात येणारी रक्कम रू.१५००/- प्रतिवर्ष ही त्यांना देण्याबाबत मागणी केली असुन श्रीमती रजनीबाई मधुरदास वैष्णव यांनी दि.१२.७.२००७ रोजी प्रतिज्ञापत्र करून संमती दिली आहे.

करीता मुळ करारनाम्यात उपरोक्त प्रमाणेचा बदल करून एप्रिल २००७ पासुन पुढील १४ वर्षाचे प्रती वर्ष रूपये १५००/- प्रमाणेची रक्कम सौ.लिलाबाई जगन्नाथ वैष्णव यांना देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर येथील विहिरीतुन कैलासनगर स्मशानभुमीस पाणी पुरवठा करण्यात येत असल्याने, श्रीमती रजनीबाई मधुरदास वैष्णव यांनी सौ.लिलाबाई जगन्नाथ वैष्णव यांच्या नांवे बक्षीस पत्र करून दिल्यानुसार व प्रतिज्ञापत्र करून संमती दिली असल्याने, भाडेतत्वावर घेतलेल्या विहिरीचे पाण्याप्रित्यर्थ महानगरपालिकेकडून देण्यात येणारी रक्कम रू.१५००/- प्रतिवर्ष ही रक्कम मुळ करारनाम्यात उपरोक्त प्रमाणेचा बदल करून एप्रिल २००७ पासुन पुढील १४ वर्षाचे प्रती वर्ष रूपये १५००/- प्रमाणेची रक्कम सौ.लिलाबाई जगन्नाथ वैष्णव यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७६ अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.६५ दि.३१/१/२००८ (१८/१/०८ ची तहकुब सभा) रोजी रक्म रू.३५,३९,२७७/- चे अंदाजपत्रक मंजुरी प्राप्त झाले असुन सदर कामासाठी ई-निविदा द्वारे निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (३) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.११/४/२००८ ला उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ११.८% कमी दराने |
| २. | मे. राणा कन्स्ट्रक्शन | २.०५% कमी दराने |
| ३. | श्री. गोसावी एस.के. | ०.०५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८% कमी दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा असुन त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी प्राप्त निविदापैकी सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ११.८% कमी दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा दर मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७६ अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार सर्वात कमी दराचे निविदाधार मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## : ऐनवेळचे विषय :

**विषय क्र. ५९ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या वॉर्ड(ड) मध्ये कचरा वाहतुकीच्या कामाचे सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी १) मे.मोना लेबर सप्लायर्स, औरंगाबाद, २) मे.सेंटर फॉर डेव्हलपमेंट, औरंगाबाद, ३) मे.ईश्वरलाल खरे ॲन्ड जे.एच.मिर्झा, औरंगाबाद या तीन एजन्सीना प्रत्येकी तीन टिप्पर्स १२१० क्षमतेचे लावुन प्रत्येक वाहनावर पाच लेबर लावुन दररोज दहा तास काम करून १००% कचरा उचलावा लागेल. आरटीओ नियमांचे पालन करावे लागेल. वाहनास ताडपत्री लावुन कचरा नारेगाव पर्यन्त वाहुन न्यावा लागेल. बिलावर कोणताही टॅक्स लागल्यास त्याची अदाई एजन्सीला करावी लागेल व अटीचे व वाहतुक नियमांचे तसेच लेबर ॲक्टचे पालन कंत्राटदारास करावे लागेल इत्यादी अटी व शर्तीवर वार्षिक खर्च रक्कम रू.७४.०० लक्ष मध्ये सम प्रमाणात करून घेण्यास देण्यात आलेले होते.

सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात मे.रामके इन्व्हायरो इंजिनियर्स प्रा.लि. हैद्राबाद यांची कचरा वाहतुकीच्या कामाची निविदा मंजुर झाली असुन काही तांत्रिक अडचणीमुळे करारनामा करण्यात आलेला नाही.

करीता सदरील प्रोजेक्ट सुरू होईपर्यन्त वरील तीन एजन्सीना मंजुर दरानुसार तीन महिने कचरा वाहतुकीचे काम करण्यास अंदाजे २५.०० लक्ष खर्च येईल. वरील प्रमाणेच्या तीन एजन्सीना १ एप्रिल २००८ ते जुन २००८ पर्यन्त मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. तसेच सध्या जुन महिना चालु असुन यापुढे देखील घन कचऱ्याचा नवीन प्रोजेक्ट सुरू होई पर्यंत या तीन एजन्सीकडून गतवर्षीच्या दरात काम करून घेण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या निर्णयानुसार सदरील प्रस्ताव रद्द करावा असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ६० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९८ नाथपुरम येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे करीता सा.बां.विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये ९,९९,४९२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली होती. त्यानुसार निविदा काढण्यात आल्या होत्या. तथापि सदरील निविदा रद्द करून सदर ठिकाणी नागरीकांच्या मागणीनुसार बॅडमींटन हॉल बांधणे बाबत स.नगरसेविका यांनी सुचविलेले आहे. त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१४,६४,८२६/- चे तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समिती समोर सादर करणेस्तव शिफारस केलेली असुन सदरील कामाचा खर्च सन २००८-०९ मध्ये व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात ये ईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१४,६४,८२६/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ९८ नाथपुरम येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे या कामाऐवजी बॅडमींटन हॉल बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.१४,६४,८२६/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.वसंत नरवडे पा. : स्पेकच्या नोटीसांचा खुलासा झालेला नाही. माझ्या वॉर्डातील ५१ लोकांनी भरलेल्या टॅक्स पावत्या वॉर्ड मध्ये दाखल केल्या. २० बाय ३०, ३० बाय ४० कडे कोणी लक्ष देत नाही. काही लोकांवर दोनदा नोटीसा बजावलेल्या आहेत ते कधी रद्द करणार याचा खुलासा करण्यात यावा. चालू व थकबाकी व एकूण हे डबल-डबल येत आहे. मी फाईल देतो. तपासणी करावी.

मा.सभापती : कर निर्धारक व संकलक यांनी खुलासा करावा.

कर निर्धारक व संकलक : स्पेकच्या संदर्भात आपण मा.आयुक्तांचे मान्यतेने प्रत्येक वॉर्डामध्ये वॉर्डनिहाय कमिटीचे गठण केलेले आहे. वॉर्ड अधिकारी आणि वॉर्ड अभियंता हेअरींग घेणार. वॉर्ड स्तरावर यामध्ये जुनी प्रॉपर्टी असेल, बदल झालेला नसेल तर जुना टॅक्स कायम ठेवण्यात येईल.

श्री.संजय जोशी : स्पेकनी लिंकींग सुध्दा करून द्यावी. आपली जी वसुली कमी झाली आहे ती चुकीच्या नोटीसांमुळे झालेली आहे. माझ्या मते रोजची वेळ ठरवावी व वर्तमानपत्रातून जाहीर प्रगटन द्यावे की, प्रत्येक झोनमध्ये दुपारी १२ ते २ किंवा ३ ते ४ ज्या नागरीकांना नोटीसा आल्या आहेत त्यांनी वॉर्ड ऑफीसमध्ये जाऊन चौकशी करावी.

कर निर्धारक व संकलक : यामध्ये ४ सुत्री कार्यक्रम आहे. सर्वात आधी जाहीर प्रगटन देणार आहोत. दुसरा वॉर्ड निहाय कमिटी करत आहोत, तिसरा चेक करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल आणि चौथा म्हणजे जो आपल्याकडे ८९ चा डाटा आणि स्पेकनी केलेले काम याचा डिजीटाईज करण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे पा. : स्पेकचे ओरीजनल काम नवीन प्रॉपर्टी शोधणे होते. परंतु या प्रॉपर्टीमध्ये एक घर दोनदा मोजमाप झालेले आहे आणि जे जुनी घरे आहेत त्यांच्याकडून पैसे वसुल केले जातील का, याचा खुलासा करावा आणि जेवढ्या नवीन इमारती बांधल्या गेल्या त्याची नोंद आपणाकडे आहे का, याचा खुलासा करावा.

मा. सभापती : नवीन प्रॉपर्टी शोधण्यासाठी ४ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. व ही यादी स.सदस्यांनी दिली त्याचे १५ दिवसांत निवारण करावे.

श्री.सिताराम सुरे : एक महिन्यापासून महानगरपालिकेने स्पेकच्या नोटीसा नागरीकांपर्यंत पोहचत्या केल्या. आतापर्यंत अनेक नागरीकांनी तो चुकीचा मालमत्ता कर भरलेला आहे. तो वजावट करणार का, याचा खुलासा करावा.

मा. सभापती : कर निर्धारक व संकलक यांनी खुलासा करावा.

कर निर्धारक व संकलक : ज्या नागरीकांना मालमत्ता कराच्या चुकीच्या नोटीसेस गेल्या आहेत तर तांत्रिक कर्मचारी जाऊन सर्व्हे करतील. बदल नसेल तर त्यांचा जुना टॅक्स कायम करण्यात येईल.

श्री.रशीद खान मामु : हे जे काम दिले ते ट्रेन्ड व्यक्तींकडे दिले की अनट्रेन्ड व्यक्तीकडे दिले. स्पेक या कंपनीने ॲग्रीमेंटच्या विरूध्द काम केल्याबद्दल कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात यावा. घर क्रमांकाच्या पाट्यांचा आकार कमी केला.

श्री.वसंत नरवडे पा. : ॲग्रीमेंट मध्ये स्पेकला नवीन प्रॉपर्टी शोधणे व टॅक्स लावण्याचे काम दिले होते. त्यांनी एकाही घराला नंबरप्लेट लावलेली नाही. आपण त्यांना १.२५ कोटी दिले ते वसुल करण्यात यावे. त्यांनी चुकीचे मोजमाप करून पैसे वसुल केले.

श्री.नारायण कुचे : १ लाख नंबर प्लेट अजूनही ऑफीसमध्ये पडलेल्या आहेत. अर्धे लावले.

श्री.वसंत नरवडे पा. : हा मुद्दा मा.आयुक्तांसमोर मांडून गुन्हा दाखल करा.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : स्पेक कंपनी बद्दल स.सदस्यांनी गंभीर आरोप केलेले आहेत. महापालिकेचे १ कोटी २० लाख रूपये स्पेक कंपनीला देण्यात आले. स्पेक कंपनीचे कामाबद्दल स.सदस्यांचे समाधान न झाल्यामुळे स्पेक कंपनीने केलेल्या कामाची चौकशी महापालिकेचे मुख्य लेखा परीक्षक श्री.जाधव साहेब करतील आणि त्यांना कर निर्धारक व संकलक श्री.अरब साहेब मदत करतील. त्यांनी एक महिन्यात चौकशी अहवाल सादर करावा. |
| श्री.संजय जोशी | : आपल्या महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना जे गणवेश देण्यात येतात ते गणवेश शैक्षणिक वर्षाच्या मध्यंतरी मिळतात. म्हणुन यावेळी प्रशासनाने सर्वसाधारण सभेकडे मार्च मध्येच प्रस्ताव ठेवला. अर्थसंकल्प झालेला नव्हता तरी पण २००८-०९ या अर्थसंकल्पात गणवेश खरेदीची तरतुद ठेवावी आणि विद्यार्थ्यांना ऑगष्टमध्ये गणवेश मिळावे म्हणून सर्वसाधारण सभेने त्याला मंजुरी दिली. परंतु आता जुन संपला तरी विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आले नाही. राष्ट्रीय सणाला गणवेश मिळतील का? याचा खुलासा सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात यावा. |
| मा.सभापती | : मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा. |
| मुख्य लेखाधिकारी | : गणवेश खरेदीसाठी एप्रिल मध्ये टेंडर काढण्यात आले होते. परंतु गणवेशाचे प्राप्त नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविले त्या संस्थेचा अहवाल १९ जुनला प्राप्त झाला असून त्यातील २ नमुने ओ.के. केले. तो मा.आयुक्तांकडे सादर केलेला आहे. लवकरच स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर केला जाईल. |
| श्री.संजय जोशी | : ६० दिवसात गणवेश देणार का, धोरणात्मक निर्णय स्थायी समितीने घेतल्यास गणवेश परत तपासणीसाठी पाठविले जाणार का. स्थायी समितीने सांगितले म्हणून पाठविले नाही असे व्हायला नको. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : मुख्य लेखाधिकारी श्री.पवार साहेब कोणत्या अधिकारात बोलतात, आणि ही जबाबदारी त्यांच्याकडे कोणी दिली? प्रशासनाने सर्व निविदा त्यांना दिले आहे का. स्थायी समिती, मा.आयुक्त देणार नसतील तर ते कसे काढणार. निविदा लेखाधिकारी यांचेकडे आहे का? |
| श्री.वसंत नरवडे पा. | : यावर्षी आपल्या शाळेत विद्यार्थी संख्येत वाढ करण्याचा प्रशासनाने प्रयत्न केला आणि किती विद्यार्थ्यांना पुस्तके दिली? गणवेश, बुट दिले याची आकडेवारी आली आहे का, विद्यार्थी संख्या पाहून टेंडर काढण्यात यावे. |
| मा. सभापती | : याचा खुलासा पुढच्या सभेत देण्यात येईल. |
| श्री.रविकांत गवळी | : मागच्या वेळेस नगर भूमापन क्र.१४४८८/१ संत एकनाथ रंगमंदिराच्या बाजुच्या पार्कींगचा विषय होता. याची २१ तारखेला स्थायी समितीने माहिती दिली. आज ०१ तारीख आहे तर १० दिवसात प्रशासनाने याबाबत काय कार्यवाही केली, याचा खुलासा करावा. पेट्रोल पंप, मोबाईल टॉवर संदर्भात प्रशासनाने कोणती कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा. |
| मा. सभापती | : उप अभियंता नगर रचना श्री.वझे साहेब यांनी संत एकनाथ रंगमंदीरच्या पार्कींग बद्दल खुलासा करावा. |
| उप अभि.(न.र.) | : खाजगी व्यक्तीची होती. सर्वसाधारण सभेने २००६ मध्ये ठराव पारित केला आहे. यामध्ये ३९७.१४ चौ.मी. एवढी जागा पार्कींगसाठी देण्यात आली आहे आणि त्याचे बांधकाम झालेले आहे. फक्त हस्तांतर करून घेणे आहे. ते मालमत्ता विभाग आणि नगर रचना विभागामार्फत हस्तांतर करून घेण्यात येईल. |
| श्री.रविकांत गवळी | : पार्कींगची जागा आपल्याला हस्तांतर केलेली आहे का व त्याला सेल आऊटची परमीशन आपण दिलेली आहे का, याचा खुलासा करावा. आपण पार्कींगला परवानगी दिली होती. त्याच्या अटी व शर्ती काय आहेत. |
| मा. सभापती | : स.सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे सविस्तर खुलासा करण्यात यावा. त्याला विक्री करण्याची परवानगी दिली आहे का व जागा आपण ताब्यात घेतली आहे का? |

उप अभि.(न.र.) : रंग मंदिरच्या बाजुचा भुखंड हा खाजगी व्यक्तीच्या नांवे होता आणि सर्वसाधारण सभेने ठराव घेतलेला होता की, तो प्लॉट रंगमंदिराच्या पार्कींगसाठी ठेवण्यात याव. परंतु संबंधीत मालकाने मनपाला विनंती केली की, मनपास पाहिजे तेवढी जागा देतो परंतु वरती मला बांधकाम करण्याची परवानगी द्यावी व २००६ मध्ये तसा ठराव सर्वसाधारण सभेने मंजुर केला होता. त्याप्रमाणे पार्कींग ठेवले. मालमत्ता अधिकारी ताब्यात घेणार. दोन्ही वापरणार.

श्री.रविकांत गवळी : संबंधीत व्यक्तीला विक्री करण्याचा अधिकार नाही. आपण जावक क्रमांक मनपा/२८/८/२००६ रोजी आपण त्यांना पत्र दिलेले आहे. भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही.

मा. सभापती : कंप्लीशन घेतल्याशिवाय त्याला विक्री करता येते का याचा खुलासा करावा.

उप अभि.(न.र.) : आपल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तशी तरतुद नाही.

मा. सभापती : संत एकनाथ रंगमंदिराच्या पार्कींग बाबत स.सदस्यांच्या म्हणण्यानुसार मालमत्ता अधिकारी यांना सोबत घेऊन उप अभियंता नगर रचना श्री.वझे साहेब यांनी तीन दिवसात अहवाल सादर करावा.

श्री.सिताराम सुरे : आपली आर्थिक परिस्थिती खालावली. ६.५० कोटी देणे आहे. विविध चौकातील पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे कामासंबंधी मुख्य लेखा परीक्षक यांच्यामार्फत अहवाल मागीतला होता. यात अतिरिक्त शहर अभियंता यांनी गुत्तेदाराला जे आगाऊ पेमेंट दिले आहे ४३.०० लाखाचे ते कुठल्या बेसवर दिले आहे, याचा खुलासा करावा. पेव्हर ब्लॉकचा साठा नाही. मार्च एन्डला देता येत नाही. लेखाधिकारी श्री.पवार यांनी चौकशी केली नाही. बाकी ६.५ कोटी दिले नाही. यांनाच कसे दिले. लहान-लहान कामे चालू राहिले असते. अनेक त्रृट्या आढळल्या.

श्रीमती जयश्री किवळेकर: विविध चौकामध्ये जे पेव्हरब्लॉक बसविले त्याबद्दल मागच्या सभेमध्ये चर्चा केली होती व अहवाल मागवला होता. मार्च पासून सर्व वॉर्डातील कामे थांबलेली आहेत व ज्या गुत्तेदारांनी कामे केली आहेत त्यांना पार्ट पेमेंट मार्चपासून देण्यात आले नाही. मनपाची आर्थिक स्थिती बिकट असतांना सुध्दा लेखा विभागाने कोणत्या बेसवर ४३.०० लाखाचे आगाऊ पेमेंट दिले, याचा खुलासा करावा. यानंतर कोणताही अहवाल स्थायी समिती सभेच्या ४ दिवस अगोदर स.सदस्यांना मिळाला पाहिजे. माझे हायमास्ट कामाचे ४ महिने झाले ३००० चे बीलही होत नाही. MSEB चे चेकही तयार होत नाही.

श्री.रशीद खान मामु : अहवालाची प्रत आज मिळाली. अभ्यासासाठी वेळ द्यावा.

मा.सभापती : पुढील मंगळवारी नियमित सभेत ठेवण्यात येईल व बैठक दुपारी ठेवण्यात येईल त्यामध्ये निर्णय घेतला जाईल.

श्री.वसंत नरवडे पा. : अजबनगर मध्ये प्रॉपर्टीचा वाद आहे. सिटी सर्व्हे नं.१३८०२/१ श्री.चावडा त्यांना आपण २००२ मध्ये ओपन प्लॉटला टॅक्स लावला होता. तो रद्द केला गेला. २००३ मध्ये त्यांच्याकडून परमीशन करता संचिका दाखल झाली, त्याचे पैसे घेतले. त्यानंतर त्यांना मिळकती न्यायालयाच्या निर्णयाची प्रत जोडून घेतली होती. त्यावर विधी सल्लागार यांच्याकडून अभिप्राय घेण्यात आला असता, मिळकत संबंधी झालेल्या निर्णयाविरूध्द महानगरपालिकेतर्फे अपील प्रस्तावित आहे. त्यावर अपील क्रमांक दिलेला नाही. याचा खुलासा व्हावा. तसेच वसुली किती झाली याचा खुलासा करावा. मालमत्ता कर, पाणीपट्ट, नगर रचना विभगाची वसुली, ओपन प्लॉटवरील टॅक्सची वसुली थकलेली आहे याकडे महसुल विभाग लक्ष देत नाही. वसुली सक्तीने झाली पाहिजे यासाठी विशेष स्थायी समिती सभा आयोजित करावयास पाहिजे. आराखडा तयार करून घ्यावा.

| | |
|---|---|
| श्री.नारायण कुचे | : वसुलीसाठी विशेष बैठक बोलविण्यात यावी.एमजीएम सारख्या मोठमोठ्या संस्थांकडे १.२५ कोटी रूपये थकीत आहेत त्यासाठी प्रशासन काय करते याचाही खुलासा करावा. |
| श्री.संजय जोशी | : वसुली करणे आवश्यक आहे. एमजीएम कडे कराची थकबाकी आहे का. |
| मा.सभापती | : महानगरपालिकेची वसुली कमी झाली नसुन वाढलेली आहे. एमजीएम वर १.२० कोटी थकीत आहेत. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : अशा किती संस्थांकडे पैसे थकीत आहेत व ज्या संस्थेने सिडकोकडून घेतलेले आहेत आणि सिडकोकडून ट्रान्सफर झाल्यानंतर आपला काय करार झालेला आहे हा मुद्दा विचारात घेण्यात यावा. सर्व संस्थांची एक यादी तयार करून वसुली करण्यात यावी. |
| श्री.संजय जोशी | : यादी करा. १ महिन्यात प्रयत्न करा. कोर्ट मॅटर असेल तर मध्यस्थी करावी. |
| मा.सभापती | : शहरात कोणाकडे १, २, ५ व १० लाखाचे वर थकबाकी आहे व ५० लाख ते १.०० कोटी थकबाकी कोणाकडे आहे याची यादी तयार करून थकबाकी स्पेकने काढली आहे. कोणाची कोर्टात केस याची सर्व माहिती घेऊन एक महिन्यात अहवाल सादर करावा. |
| श्री. कचरू मोरे | : मागच्या मिटींगमध्ये चुन्नीलाल आसाराम पेट्रोल पंपाजवळील रस्ता दुभाजक बंद करून तेथील सिग्नल एसएससी बोर्डाजवळील चौकात बसविण्यात यावे असे रूलींग दिले होते. त्याची अंमलबजावणी का होत नाही, याचा प्रशासनाने खुलासा करावा. |
| मा. सभापती | : तांत्रिक अडचण आहे. अतिरिक्त शहर अभियंता यांनी याबाबत माझ्याकडे खुलासा केलेला आहे. ते बंद करणार. उड्डाण पुलाच्या कामात जाणार आहे. |
| श्री.वसंत नरवडे पा. | : एस.एस.सी. बोर्ड जवळ सिग्नल बसवावे. |

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद